# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

MUHS

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

Tel:( 0253 2539179/169/173/6659179/169/173 ☎ Student Helpline:0253-2539111/6659111/100

Website: www.muhs.ac.in, E-mail: sw@muhs.ac.in

**डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ** | **Dr. Rajendra Shivaji Bangal**

एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी, एल.एल.बी. | M.B.B.S, M.D.( Forensic Medicine), D.N.B, L.L.B.

**कुलसचिव** | **Registrar**


मआविवि/विद्यार्थी कल्याण/इंद्रधनुष्य/१०७३ /२०२२ दि.२६/०८/२०२२

"परिपत्रक क्र. -२५ /२०२२"

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य,
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये,
म.आ.वि.वि., नाशिक

विषय : "इंद्रधनुष्य २०२२-२३" करीता विद्यापीठाचा संघ पाठविण्यासाठी विद्यापीठस्तरावर निवड चाचणी आयोजित करणेबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस अवगत करण्यात येते की, राज्यपाल कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांपैकी सन २०२२-२३ मधील **इंद्रधनुष्य** हा सांस्कृतिक उपक्रम महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी जि. अहमदनगर येथे दि. ०५ नोव्हेंबर ते ०९ नोव्हेंबर, २०२२ या संभाव्य तारखेस आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमार्फत प्रतिनिधीत्व करण्याकरीता निवडक संघ इंद्रधनुष्य या सांस्कृतिक महोत्सवास पाठविला जात असतो.

सदर महोत्सवात विद्यापीठाच्या संघाने सहभागी होवुन जास्तीत जास्त पारितोषिके प्राप्त करावी असा मानस आहे. त्यामुळे इंद्रधनुष्य करीता जो संघ पाठवायचा आहे, त्या संघाच्या निवडीकरीता प्रथमतः सर्व संलग्नीत महाविद्यालयात महाविद्यालयीन स्तरावर प्राथमिक फेरीचे आयोजन करावयाचे आहे. महाविद्यायीन स्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांची अंतिम निवड विद्यापीठ स्तरावर निवड चाचणीद्वारे करण्यात येईल. यातुन निवडक अशा कलाप्रकारांतील उत्कृष्ट विद्यार्थ्यांचा संघ इंद्रधनुष्य २०२२-२३ करीता पाठविण्यात येईल.

इंद्रधनुष्यासाठी संघ पाठविणेकरीता महाविद्यालयस्तरावर (संगीत (Music), नृत्य (Dance), साहित्य कला (Literary), नाट्यकला (Theatre), ललित कला (Fine Arts) ) या ५ कलाप्रकारात अंतर्गत २४ उपप्रकार यांची निवड चाचणी महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करावी. तसेच ज्या कलाप्रकारांमध्ये एकापेक्षा जास्त विद्यार्थ्यांची निवड झाली असेल त्या कला प्रकारांची निवड चाचणी विद्यापीठ परिसरात घेवुन निवडक

विद्यार्थ्याचा संघ "इंद्रधनुष्य २०२२-२३" करीता महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे पाठविण्यात येईल.

२८/८/२०२२

कुलसचिव

सोबत :

१. महाविद्यालयाची विहीत नमुन्यातील प्रवेशिका **(Annexure I)**
२. स्पर्धकांचा नोंदणी अर्ज **(Annexure II)-**
३. सांघिक स्पर्धेसाठी चा अर्ज **(Annexure III)**
४. संघ व्यवस्थापकाचा अर्ज **(Annexure IV)**
५. महाविद्यालयाने कला प्रकारानुसार नोंदणी अर्ज **(Annexure V)**
६. महाविद्यालय, संघ व्यवस्थापक व स्पर्धक विद्यार्थी करीता नियमावली **(Annexure VI)**
७. कलाप्रकारांची यादी **(Annexure VII)**
८. कलाप्रकारांकरितांचे अटी व नियम **(Annexure VIII)**

**टिप - मा. अधिष्ठाता/ प्राचार्य यांना विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाकडून सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची अंतिम यादी ही विद्यापीठास दि. १६/०९/२०२२ पुर्वी पाठविण्यात यावी. दि. १६/०९/२०२२ नंतर उशिराने प्राप्त झालेल्या प्रवेशिका कुठल्याही सबबीवर स्विकारल्या जाणार नाहीत. अर्धवट भरलेल्या प्रवेशिका ग्राहय धरल्या जाणार नाही. इंद्रधनुष्य २०२२-२३ करीता विद्यापीठाचा संघ निवडीकरीताचे सर्व अधिकार विद्यापीठाकडे राखुन ठेवण्यात आले आहे.**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४, Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
EPABX: 0253-2539100-300, Phone: 0253-2539173/179/169
Website : www.muhs.ac.in, E-mail : sw@muhs.ac.in

## ANNEXURE – I

1. Name of the Participating College ______________________________

(IN BLOCK LETTERS) ______________________________

2. Name and College address with Phone No.

______________________________

______________________________

| Details of Contingent | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Participants | Male | | Female | |
| 02 | Accompanists | Male | | Female | |
| 03 | Team Manager | | | | |

## Participation Confirmation

The Participation of ______________________________

Place : ________________

Date : ________________

Signature

Dean / Principal
(Signature with Seal)

Note :

1. Total Number of Contingent should not be exceed 40 persons including participants, accompanists and Team Manager.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४, Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
EPABX: 0253-2539100-300, Phone: 0253-2539173/179/169
Website : www.muhs.ac.in, E-mail : sw@muhs.ac.in

# ANNEXURE – II

## Curriculum Vitae of Participant / Accompanying Artist

(This proforma is to be filled in by each member of the contingent)

1. Name of the Participant : ______________________________

2. Class Studying : ______________________________

3. Date of Birth : ____________ Age as on 2022 ________

4. Residential Address & ______________________________

______________________________

5. Phone No ____________ Mobile No. ____________

Paste your recent Passport photo

6. E- mail ID ______________________________

7. Items Participating (Individual) 1.______________________

2.______________________

3.______________________

(Group) 1.______________________

2.______________________

8. No. of times participated in Spandan Festival ______________________

9. Item in which acting as Accompanist ______________________

Signature
Participant/Accompanist

Dean / Principal
(Signature with Seal)

Certified that the particulars as given above have been verified and found to be correct to the best of my knowledge and belief.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४, Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
**EPABX:** 0253-2539100-300, **Phone:** 0253-2539173/179/169
**Website :** www.muhs.ac.in, **E-mail :** sw@muhs.ac.in


## ANNEXURE – III

### Event wise participation

**Name of the College :** ______________________________

**Event Category : Music** ☐ **Dance** ☐ **Literary** ☐ **Theatre** ☐ **Fine Arts** ☐

**Event :** ______________________ **(Please use separate forms for different events)**

| Name of Participants in this Event | | | |
|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Name of Participants (please check the spelling)** | **Other items in which participating** | **Items in which you are an accompanist** |
| 1. | | | |
| 2. | | | |
| 3. | | | |
| 4. | | | |
| 5. | | | |
| 6. | | | |
| 7. | | | |
| 8. | | | |
| 9. | | | |
| 10. | | | |

| Name of Participants in this Event | | | |
|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Name of Participants (please check the spelling)** | **Other items in which participating** | **Items in which you are an accompanist** |
| 1. | | | |
| 2. | | | |
| 3. | | | |
| 4. | | | |
| 5. | | | |

**Dean/ Principal**
**(Signature & Seal)**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४, Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
**EPABX:** 0253-2539100-300, **Phone:** 0253-2539173/179/169
**Website** : www.muhs.ac.in, **E-mail** : sw@muhs.ac.in

# ANNEXURE – IV

## Curriculum Vitae of Team Manager

**(This proforma is to be filled in by each member of the contingent)**

**1. Name of Team Manager:** ______________________________

**2. Residential Address &:** ______________________________

______________________________

Paste your recent Passport photo

**3. Phone No** ______________ **Mobile No.** ______________

**4. E- mail ID** ______________________________

**5. Items Participating 1.** ______________________________

**2.** ______________________________

**6. No. of times participated in Spandan Festival** ______________________________

**9. Item in which acting as Accompanist** ______________________________

**Signature**
**Team Manager**

**Dean / Principal**
**(Signature with Seal)**

Certified that the particulars as given above have been verified and found to be correct to the best of my knowledge and belief.

ANNEXURE – V

# Maharashtra University of Health Sciences, Nashik

## Event – wise entry

**Name of College:** ............................................................................ **Name of Team Manager:**............................................................................

| Sr. No. | Name of the Students | Music (A) | | | | | | | | Dance (B) | | Literary (C) | | | Theater (D) | | | | Fine Arts (E) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

The participants are bonafide students of our College and they fulfill the eligibility and other criteria. It is understood that any misbehavior / misconduct by ny member of our contingent will be liable for disciplinary action. Kindly make the required number of photocopies (Email this to Email ID sw@muhs.ac.in) **Please ark the entry with Y.**

**Dean / Principal**
**Signature & Seal**

Annexure VI

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## इंद्रधनुष्य प्राथमिक निवड चाचणी

## महाविद्यालयासाठी नियमावली व माहिती पत्रक

---

अ. महाविद्यालय व संघ व्यवस्थापकांना महत्वाच्या सुचना :

१) प्रत्यके महाविद्यालयाच्या संघासोबत एक संघव्यवस्थापक असणे अनिवार्य आहे.

२) एका स्पर्धकास जास्तीत-जास्त तीन वैयक्तिक व दोन सांघिक अशा पाच कला प्रकारात सहभागी होता येईल. जास्तीचा सहभाग आढळून आल्यास संबंधीत स्पर्धकाचा सहभाग रद्द करण्यात येईल.

३) सर्व संघ व्यवस्थापकांनी स्पर्धेच्या कालावधीत संघासोबत निवासी थांबणे सक्तीचे आहे व त्यांनी आपआपल्या विद्यार्थ्यासोबत थांबणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. संघ व्यवस्थापकांनी स्पर्धकास, नातेवाईक अथवा मित्र यांच्याकडे जाण्यास परवानगी देवु नये.

४) महाविद्यालयाने विहीत नमुन्यातील अर्ज प्रवेशिकेसोबत (Annexure I) पाठवावा. प्रत्येक संघासोबत स्पर्धकांचा नोंदणी अर्ज (Annexure II) सांघिक स्पर्धेसाठीचा अर्ज (Annexure III) व संघ व्यवस्थापकाकरीता (Annexure IV) भरुन पाठविणे आवश्यक आहे याची कृपया नोंद घ्यावी. तसेच प्रत्येक महाविद्यालयाने कला प्रकारानुसार नोंदणी (Annexure V) मधील प्रत्येक विद्यार्थ्याच्या नावापुढे स्पर्धेच्या संबंधीत रकान्यात (Y) ही खुण करावी.

५) कला प्रकारानुसार सादरीकरणाचा क्रम ठरविला जाईल. नोंदणीच्या वेळी तो जाहिर केला जाईल व त्याचप्रमाणे सादरीकरण होईल.

६) कोणत्याही कला प्रकारासाठी लागणारी वाद्ये व इतर साहित्य स्पर्धकाने स्वतःचे आणावयाचे आहे.

७) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहिल व तो सर्वांवर बंधनकारक राहिल. संघ व्यवस्थापकांनी कोणत्याही कारणाने परिक्षकांना भेटु नये. परीक्षकांवर कुठल्याही प्रकारचा दबाव आणल्यास स्पर्धकास स्पर्धेतुन बाद करण्यात येईल.

८) सामूहिक कला प्रकारात संघ मुलांचा अथवा मुलींचा अथवा मुलामुलींचा मिश्र असला तरी चालेल.

९) कोणत्याही स्पर्धकाचे वय स्पर्धेच्यावेळी २५ वर्षापेक्षा जास्त असणार नाही याची काळजी प्रत्येक महाविद्यालयाने घ्यावी.

१०) महाविद्यालयाच्या संघाचा प्रवास व दैनंदिन खर्च महाविद्यालयाने करावयाचा आहे याची नोंद घ्यावी.

११) इंद्रधनुष्य निवड चाचणी संबंधी कोणताही निर्णय घेण्याचा, कार्यक्रमात बदल करण्याचा तसेच एखादी स्पर्धा रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास आहे.

१२) प्रत्येक महाविद्यालयाचा संघ ४० पेक्षा अधिक असु नये. यामध्येच संगीत साथीदार व संघव्यवस्थापक यांचीही संख्या अंतर्भुत आहे.

१३) एखादया स्पर्धेसाठी पुरेसे स्पर्धक नसल्यास सदर स्पर्धा रद्द करण्याचे तसेच सर्व साधारण नियमांमध्ये बदल करण्याचे अधिकार संयोजकांकडे असतील.

ब. स्पर्धक विद्यार्थ्यांना महत्वाच्या सूचना :

१) ललितकला या स्पर्धेअंतर्गत तयार चित्र, मृदु शिल्प इत्यादींवर स्पर्धकांचा अधिकार असणार नाही.

२) प्रत्येक विद्यार्थ्याने संघ व्यवस्थापकांच्या सुचनांचे पालन करावे. निवासस्थानी, स्पर्धा परिसरात व प्रत्यक्ष स्पर्धेच्या वेळी शांतता ठेवावी.

३) प्रत्येक स्पर्धकांने महाविद्यालयाचे ओळखपत्र आपल्या सोबत ठेवावे. तसेच स्पर्धेचे ओळखपत्रक शरीराच्या दर्शनी भागावर दिसेल अशा ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

४) स्पर्धकांनी परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी मदत करावी.

५) रॅगींग, मद्यपान करुन गोंधळ घालणे, परिक्षकांवर दबाव आणणे इ. प्रकारच्या कृति करणाऱ्या स्पर्धकांवर कडक कार्यवाही करण्यात येईल.

८) वरील नियमभंग करणाऱ्या विद्यार्थ्यावर कडक कारवाई करण्यात येईल / संघ बाद करण्यात येईल. त्याचा परिणाम संघाच्या एकूण कामगिरीवर होईल, याची नोंद घ्यावी.

**Annexure VII**

## (LIST OF EVENTS)

| A. | संगीत (Music) | Min. Time | Max Time | Participant/s | Accompanist |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Classical Vocal Solo (Hindustani / Karnataki) | 08 | 10 | 01 | 02 |
| 2 | Classical Instrumental Solo (Percussion – Tal Vadya) | 08 | 10 | 01 | 02 |
| 3 | Classical Instrumental Solo (Non Percussion) | 08 | 10 | 01 | 02 |
| 4 | Light Vocal Indian* | 04 | 06 | 01 | 02 |
| 5 | Western Vocal Solo* | 04 | 06 | 01 | 02 |
| 6 | Group Song Indian | 08 | 10 | 06 | 03 |
| 7 | Group Song Western | 08 | 10 | 06 | 03 |
| 8 | Folk Orchestra | 07 | 10 | 09 | 03 |
| B. | नृत्य (Dance) | | | | |
| 9 | Folk / Tribal Dance | 08 | 10 | 10 | 05 |
| 10 | Classical Dance | 12 | 15 | 01 | 03 |
| C. | साहित्य कला (Literary) | | | | |
| 11 | Quiz | -- | -- | 03 | -- |
| 12 | Elocution* | 04 | 05 | 01 | -- |
| 13 | Debate* | 04 | 05 | 02 | -- |
| D. | नाट्यकला (Theater) | | | | |
| 14 | One Act Play | 25 | 30 | 09 | 03 |
| 15 | Skit | 08 | 10 | 06 | 03 |
| 16 | Mime* | 04 | 05 | 06 | 02 |
| 17 | Mimicry* | 04 | 05 | 01 | -- |
| E. | ललित कला (Fine Arts) | | | | |
| 18 | On the Spot Painting | 120 | 150 | 01 | -- |
| 19 | Collage | 120 | 150 | 01 | -- |
| 20 | Poster Making | 120 | 150 | 01 | -- |
| 21 | Clay Modeling | 120 | 150 | 01 | -- |
| 22 | Cartooning | 120 | 150 | 01 | -- |
| 23 | Rangoli | 120 | 150 | 01 | -- |
| 24 | Spot Photography | 120 | 150 | 01 | -- |

वरील तारांकीत (*) कलाप्रकारांसाठी जास्तीचा १५ सेकंद व अन्य कलाप्रकारांना जास्तीचा ३० सेकंद वेळ त्यांना असलेल्या मुदतीनंतर दिला जाईल.

**Annexure VIII**

# इंद्रधनुष्य प्राथमिक निवड चाचणी

## कला प्रकार - अटी व नियम

(अ) संगीत (MUSIC):

**१) शास्त्रीय गायन (Classical Vocal Solo) Hindustani/Karnataki :**

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहील.

२) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पुर्वतयारीसाठी ५ मिनीटे असतील व सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १० मिनिटे दिले जातील व सदर वेळ अंतीम उदघोषणा झाल्यापासुन लगेचच मोजण्यात येईल.

३) संगीत साथिदारांची संख्या जास्तीत जास्त दोन असेल. तथापी गाणाऱ्या कलाकारास वाद्य वाजवायचे असल्यास वाद्य वाजविता येईल.

४) या कला प्रकारात निव्वळ शास्त्रीय गायन करता येईल. चित्रपटातील शास्त्रीय संगीतावर आधारीत गाणी गाता येणार नाहीत.

५) राग, ताल, बंदिश याबाबतची संपुर्ण माहिती मराठी / हिंदी भाषेत लिहुन त्याच्या तीन प्रती स्पर्धेपुर्वी परीक्षकांकडे सादर कराव्या लागतील.

६) सूर, ताल, रागाची निवड, सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण देण्यात येइर्ल.

**२) शास्त्रीय वाद्य संगीत (ताल वाद्य) (Classical Instrumental Solo/ Percussion) :**

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहिल.

२) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पुर्वतयारीसाठी ५ मिनीटे असतील व सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १० मिनिटे दिले जातील व अंतीम उदघोषणा झाल्यापासुन लगेचच मोजण्यात येईल.

३) संगीत साथीदारांची संख्या जास्तीत जास्त दोन असेल.

४) स्पर्धकांनी आपली वाद्य स्वतः आणणे अनिवार्य असेल.

५) सादरीकरण हिंदुस्तानी अथवा कर्नाटकी पध्दतीनेच असावे.

६) सुर, ताल, रागाची निवड, सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ व एकूण दृकश्राव्य परिणाम यानुसार स्पर्धकास गुण देण्यात येईल.

**३) शास्त्रीय वादन (स्वर वाद्य) (Classical Instrumental Solo/Non Percussion) :**

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहिल.

२) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पुर्वतयारीसाठी ५ मिनीटे असतील व सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १० मिनिटे दिले जातील व सदर वेळ अंतीम उदघोषणा झाल्यापासुन लगेचच मोजण्यात येईल.

३) संगीत साथीदारांची संख्या जास्तीत जास्त दोन असेल.

४) स्पर्धकांनी आपली वाद्य स्वतः आणणे अनिवार्य असेल. (सिंथेसायजर चालणार नाही)

५) मुळात पाश्चात्य असलेले परंतु भारतीय शास्त्रीय वादनात स्विकारलले ी वाद्य वापरलेली चालतील.

६) सादरीकरण हिंदुस्तानी अथवा कर्नाटकी पध्दतीनेच असावे.

७) सुर, ताल, रागाची निवड, सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ व एकूण दृकश्राव्य परिणाम यानुसार स्पर्धकास गुण देण्यात येईल.

४) सुगम संगीत (भारतीय) ( Light Vocal - Indian ) :

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहील.

२) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पुर्वतयारीसाठी ५ मिनीटे असतील व सादरीकरणासाठी जास्तीत जास्त ६ मिनिटे दिले जातील व सदर वेळ अंतीम उदघोषणा झाल्यापासुन लगेचच मोजण्यात येईल.

३) संगीत साथिदारांची संख्या जास्तीत जास्त दोन असेल. तथापी गाणाऱ्या कलाकारास वाद्य वाजवायचे असल्यास वाद्य वाजविता येईल.

४) या कला प्रकारात इंग्रजी वगळता इतर भारतीय भाषांतील भावगीत, भजन, गझल, अभंग, सादर करता येईल. सिनेगितांना या कलाप्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.

५) मराठी व हिंदी वगळता इतर पारंपारीक भाषेतील गीत सादर करावयाचे असल्यास सदर गीताच्या मराठी / हिंदी भाषेतील भाषांतराच्या तीन प्रती स्पर्धेपुर्वी परीक्षकांकडे सादर कराव्या.

६) सुर, ताल, रागाची निवड, सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण देण्यात येईल.

५) पाश्चिमात्य गायन (व्यक्तिगत) (Western Vocal Solo) :

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहिल.

२) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पुर्वतयारीसाठी ५ मिनीटे असतील व सादरीकरणासाठी जास्तीत जास्त ६ मिनिटे दिले जातील व सदर वेळ अंतीम उदघोषणा झाल्यापासुन लगेचच मोजण्यात येईल.

३) संगीत साथिदारांची संख्या जास्तीत जास्त दोन असेल. तथापी गाणाऱ्या कलाकारास वाद्य वाजवायचे असल्यास वाद्य वाजविता येईल.

४) या कला प्रकारात निव्वळ इंग्रजी भाषेत गायन करता येईल मात्र चित्रपटातील गाणी गाता येणार नाहीत.

५) राग, ताल, बंदिश व अर्थ याबाबतची संपुर्ण माहिती मराठी / हिंदी भाषेत लिहुन त्याच्या तीन प्रती स्पर्धेपुर्वी परीक्षकांकडे सादर कराव्या.

६) या कलाप्रकारात कॅसीओ / सिंथेसायझर / इतर इलेक्ट्रॉनिक गॅजेट (उपकरण) वापरावयाचे असल्यास एकाच सुरात (डवकम) वाजविता येईल.

७) सुर, ताल, रागाची निवड, सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ व एकूण दृकश्राव्य परिणाम यानुसार स्पर्धकास गुण देण्यात येईल.

६) भारतीय समुहगान (Group Song Indian) :

१) एका महाविद्यालयाच्या एकाच संघास प्रवेश परवानगी राहील.

२) सिनेगीतांना या कलाप्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.

३) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पूर्वतयारीसाठी ५ मिनिटे दिली जातील सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १० मिनिटे दिले जातील. हा वेळ उद्घोषणा झाल्यापासुन लगेचच मोजण्यात येईल.

४) संगीत साथीदारांची संख्या जास्तीत जास्त तीन व स्पर्धक संख्या सहा मान्य राहील. गायकांना गातांना वाद्य वाजविता येईल.

५) मराठी व हिंदी वगळता इतर पारंपारीक भाषेतील गीत सादर करावयाचे असल्यास सदर गीताच्या मराठी / हिंदी भाषेतील भाषांतराच्या तीन प्रती स्पर्धेपुर्वी परीक्षकांकडे सादर कराव्या.

६) या कलाप्रकारात देश भक्तीपर गीत मराठी किंवा हिंदीमधुन सादर करता येईल. सदर संघास दोन समूह गीते लागोपाठ सादर करावे लागतील त्यापैकी पहिले देश भक्तीपर व दुसरे पारंपारिक लोकगीत असावे.

७) सुर, ताल, रागाची निवड, सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण देण्यात येईल.

७) पाश्चिमात्य समूहगान (Group Song Western) :

१) एका महाविद्यालयाच्या एकाच संघास प्रवेश परवानगी राहिल. संघात फक्त ६ स्पर्धक असतील.

२) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पुर्वतयारीसाठी ५ मिनीटे असतील व सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १० मिनिटे दिले जातील व सदर वेळ अंतीम उदघोषणा झाल्यापासुन लगेचच मोजण्यात येईल.

३) संगीत साथिदारांची संख्या जास्तीत जास्त तीन मान्य राहील परंतु गाणाऱ्या कलाकारास वाद्य वाजविता येईल.

४) या कला प्रकारात निव्वळ इंग्रजी भाषेत गायन करता येईल.

५) राग, ताल, बंदिश व अर्थ याबाबतची संपुर्ण माहिती मराठी / हिंदी भाषेत लिहुन त्याच्या तीन प्रती स्पर्धेपुर्वी परीक्षकांकडे सादर कराव्या.

६) सुर, ताल, रागाची निवड, सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ व एकूण दृकश्राव्य परिणाम यानुसार स्पर्धकास गुण देण्यात येईल.

८) लोकसंगीत (Folk Orchestra) :

१) एका महाविद्यालयाच्या एकाच संघास प्रवेश परवानगी राहिल. संघात फक्त ९ स्पर्धक असतील.

२) संगीत साथिदारांची संख्या जास्तीत जास्त दोन असेल. तथापी गाणाऱ्या कलाकारास वाद्यवाजवायचे असल्यास वाद्य वाजविता येईल. व्यावसायिक संगीत साथीदार घेता येईल मात्र त्याने वेगळा वेश परिधान करुन विद्यार्थी स्पर्धकांपासुन वेगळया जागी उभे / बसावे लागेल.

३) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पुर्वतयारीसाठी ५ मिनीटे असतील व सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १० मिनिटे दिले जातील व अंतीम उद्घोषणा झाल्यापासुन लगेचच मोजण्यात येईल.

४) या कला प्रकारात निव्वळ मराठी भाषेतील लोकगीते सादर करता येतील मात्र चित्रपटातील गाणी गाता येणार नाहीत.

५) राग, ताल, बंदिश व अर्थ याबाबतची संपुर्ण माहिती मराठी / हिंदी भाषेत लिहुन त्याच्या तीन प्रती स्पर्धेपुर्वी परीक्षकांकडे सादर कराव्या.

६) या कलाप्रकारात कॅसीओ / सिंथेसायझर / इतर इलेक्ट्रॉनिक गॅजेट (उपकरण) वापरता येणार नाही.

७) सुर, ताल, रागाची निवड, सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ व एकूण दृकश्राव्य परिणाम यानुसार स्पर्धकास गुण देण्यात येईल.

(ब) नृत्य (Dance):

१) लोक/आदिवासी नृत्य (Folk/Tribal Dance) :

१) एका महाविद्यालयाच्या एकाच संघास प्रवेश परवानगी राहील. सदर संघात जास्तीत जास्त १० स्पर्धक भाग घेऊ शकतील.

२) संगीत साथीदारांची व इतर सहाय्यकांची संख्या जास्तीत जास्त पाच मान्य राहील.

३) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पुर्वतयारीसाठी १० मिनिटे व सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १० मिनिटे दिले जातील. हा वेळ अंतीम उदघोषणा झाल्यापासुन लगेचच मोजण्यात येईल.

४) सदर संघास पारंपारीक लोक कलेवर आधारीत अथवा प्रादेशिक लोकनृत्य सादर करता येईल.

५) प्रादेशिक लोकनृत्य मराठी किंवा हिंदी भाषेव्यतीरिक्त इतर भाषेतील असल्यास सदर गिताचे मराठी किंवा हिंदी भाषेतील भाषांतर व नृत्याची पार्श्वभूमी प्रकट करणारे ३ प्रतितील लेखी निवेदन परीक्षकांना सादर करावे लागेल.

६) सिनेगीतांना व कॅसेट वापरण्यास या कलाप्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.

७) ताल, रागाची निवड, सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ व एकूण दृकश्राव्य परिणाम यानुसार स्पर्धकास गुण देण्यात येईल.

२) शास्त्रीय नृत्य (भारतीय) - (Classical Dance Indian) :

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहिल. सदर स्पर्धकास भारतीय नृत्य प्रकारांपैकी एका प्रकारातील नृत्य सादर करावे लागेल.

२) भारतीय शास्त्रीय नृत्यांची पार्श्वभूमी व वैशिष्टये प्रकट करणारे लेखी निवेदन तीन प्रतीत स्पर्धेपूर्वी परीक्षकाकडे सादर करावे लागेल.

३) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पुर्वतयारीसाठी १० मिनीटे असतील. सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १५ मिनिटे दिले जातील व सदर वेळ अंतीम उदघोषणा झाल्यापासुन लगेचच मोजण्यात येईल.

४) भारतीय शास्त्रीय नृत्यात कथ्थक, कथ्थकली, भरतनाटयम, मोहिनीअट्टम, मणिपूरी, कुचीपूडी, ओडिसी, आदी नृत्यांचा प्रकार असावा.

५) गायक व संगीत साथीदांराची संख्या जास्तीत जास्त तीन असावी.

६) सिनेगीतांना व कॅसेट वापरण्यास या कलाप्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.

७) सुर, ताल, रागाची निवड, सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ व एकूण दृकश्राव्य परिणाम यानुसार स्पर्धकास गुण देण्यात येईल.

## (क) साहित्य कला (LITERARY) :

### १) सामान्य ज्ञान चाचणी (Quiz Competition) :

१) एका महाविद्यालयाच्या जास्तीत जास्त तीन स्पर्धकास प्रवेश परवानगी राहिल.

२) स्पर्धेचे माध्यम लेखी चाचणीसाठी इंग्रजी व अंतीम फेरीसाठी मराठी / इंग्रजी असेल.

३) स्पर्धेसाठी पहिल्या फेरीत लेखी चाचणी व दुसऱ्या फेरीत दृकश्राव्य (Audio/Video) प्रश्नोत्तरे असतील.

४) स्पर्धेसाठी सामान्यज्ञान, विज्ञान, आरोग्य विज्ञान, इतिहास व चालु घडामोडी इत्यादी विषयांमधील प्रश्न विचारले जातील.

### २) वक्तृत्व स्पर्धा (Elocution) :

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहिल.

२) स्पर्धेचे माध्यम मराठी, हिंदी किंवा इंग्रजी असेल.

३) स्पर्धकास बोलण्यासाठी एकुण ५ मिनिटे वेळ दिला जाईल व ४ मिनीटानंतर सुचनेची घंटी वाजविण्यात येईल.

४) वक्तृत्व स्पर्धेचा विषय संघ व्यवस्थापकांच्या बैठकीत जाहीर करण्यात येईल.

५) बोलणे, गद्य व पद्य प्रकारात असु शकते परंतु गायन नसावे.

### ३) वादविवाद स्पर्धा (Debate) :

१) एका महाविद्यालयाच्या एकाच संघास प्रवेश परवानगी राहील. त्यात दोन स्पर्धक असतील त्यापैकी एक स्पर्धक प्रस्तावाची बाजू तर दुसरा विरुध्द बाजू मांडेल. मात्र दोन्ही स्पर्धकांना एकाच भाषेत बोलावे लागेल.

२) स्पर्धेचे माध्यम मराठी, हिंदी किंवा इंग्रजी असेल.

३) प्रत्येक स्पर्धकास बोलण्यासाठी ५ मिनीटे वेळ दिला जाईल व ४ मिनीटानंतर सुचनेची घंटी वाजविण्यात येईल.

४) वादविवाद स्पर्धेचा विषय संघव्यवस्थापकांच्या बैठकीत जाहीर करण्यात येईल.

५) लिहुन आणलेले साहित्य वाचणे ग्राहय धरले जाणार नाही.

## (ड) नाटयकला (THEATRE) :

### १) एकांकिका (One Act Play) :

१) एका महाविद्यालयाच्या एकाच संघास या कलाप्रकारामध्ये सहभाग घेता येवु शकेल.

२) सादरीकरणासाठी कमाल ३० (तीस) मिनीटांचा कालावधी उपलब्ध राहील.

३) वेळेची सुचना दिल्यानंतर किंवा संघाचे सादरीकरण आरंभ केले यापैकी जे आधी घडेल तेव्हापासुन केले जाईल.

४) रंगमंच व्यवस्था व संच/साहित्य निर्मुलन करण्याकरिता १० (दहा) मिनीटांचा कालावधी दिला जाईल.

५) कमाल ०९ (नऊ) पेक्षा अधिक कलावंत तसेच ०३ (तीन) पेक्षा अधिक साथीदार यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश नसावा. सहभागी संघाना संघ व साहित्य स्वतःचे आणावे लागेल. सामान्य प्रकाश व्यवस्था व सामान्य साहीत्य पुर्वसुचनेनूसार पुरविले जाईल.

६) सादरीकरणाकरिता मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेचा उपयोग करावा लागेल.

७) सहभागी संघाना अर्धा तास पुर्वी स्पर्धेच्या संयोजकास संपर्क करणे आवश्यक राहील.

८) परिक्षकांचा निकाल हा संकल्पना, अभिनय, नेपथ्य, रंगमंच व्यवस्था, सादरीकरण व सामान्य प्रभाव यांवर आधारित राहील.

९) पार्श्वसंगीताकरिता साथीदार हे वाद्यांचा वापर करु शकतील किंवा त्यांना पडद्याआडुन सादरीकरण करावे लागेल. साथीदार हे रंगमंचावर उपस्थित होऊ शकणार नाही.

२) **विडंबन नाटय (Skit) :**

१) एका महाविद्यालयाच्या एकाच संघास व त्यात जास्तीत जास्त सहा स्पर्धकास परवानगी राहील

२) जास्तीत जास्त तीन साथीदार/सहाय्यक (Back Stage Assistants) मदतीस घेता येतील.

३) स्पर्धेचे माध्यम मराठी, हिंदी किंवा इंग्रजी असेल.

४) पूर्वतयारीसाठी ५ मिनीटे व सादरीकरणासाठी १० मिनीटे वेळ दिला जाईल व सदर वेळ अंतीम उदघोषणा झाल्यापासुन लगेचच मोजण्यात येईल.

५) संहीता स्वतःची किंवा दूसऱ्या लेखकाची असल्यास चालेल मात्र संहीता दुसऱ्याची असल्यास नाटयलेखकाच्या लेखी परवानगीसह सादरीकरणाच्या संहीतेच्या तीन प्रति परीक्षकांकडे स्पर्धेपुर्वी सादर न केल्यास संघ बाद करण्यात येईल.

६) वेशभूषा, रंगभूषा व पार्श्वसंगीत यांना परवानगी आहे. परंतू त्यात कोणत्याही व्यक्तीवर थेट टिका असू नये.

७) सादरीकरणाचा दर्जा, एकसंघपणा, अभिनय, नाटयकल्पना यानुसार गुण देण्यात येईल.

३) **मुकअभिनय – समुह (Mime - Group) :**

१) एका महाविद्यालयाच्या एकाच संघास व त्यात जास्तीत जास्त सहा स्पर्धकास परवानगी राहील.

२) जास्तीत जास्त दोन साथीदार/सहाय्यक (Back Stage Assistants) मदतीस घेता येईल.

३) सादरीकरणासाठी एकुण ५ मिनिटे वेळ दिला जाईल.

४) या प्रकारात हावभाव, हातवारे व मुकअभिनय याव्दारे कल्पना सादर करावयाची असल्यामुळे कुठल्याही प्रकारचे साहित्य वापरता येणार नाही परंतु पार्श्वसंगीत वाजविता येईल.

५) स्पर्धकांना पांढऱ्या शुभ्र किंवा काळया रंगाचे तंग (Skin Tight) कपडे घालता येतील व चेहऱ्यावर रंगभुषा करता येईल.

६) सादरीकरणाचा दर्जा, एकसंघपणा, अभिनय, नाटयकल्पना यानुसार गुण देण्यात येईल.

४) **मिमिक्री (Mimicry) :**

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहिल.

२) स्पर्धेचे माध्यम मराठी, हिंदी किंवा इंग्रजी असेल.

३) सादरीकरणासाठी एकुण ५ मिनिटे कालावधी देण्यात येईल. संगीतसाथ आवश्यक असल्यास त्याच्या पूर्वतयारीसाठी अतिरीक्त ५ मिनिटे देण्यात येईल.

४) वेशभूषा, रंगभूषा व पार्श्वसंगीत यांना परवानगी आहे. परंतू कोणत्याही व्यक्तीवर थेट टिका असू नये. तसेच सादरीकरणात व्दिअर्थी (डबल मिनींग) अश्लिलता किंवा किळसवाणेपणा नसावा. असे आढळल्यास तो स्पर्धक स्पर्धेतुन बाद होईल.

५) या स्पर्धेत पशु पक्षी, सिनेकलावंत, नेते तसेच इतर असामान्य आवाज काढता येतील.

६) स्पर्धकास ध्वनी व्यवस्थेचा वापर आवश्यकतेप्रमाणे करता येईल.

७) सादरीकरण, दर्जा, अभिनय, मध्यवर्ती कल्पना यानुसार गुण देण्यात येईल. " खालील कलाप्रकारात एका स्पर्धकाने जास्तीत जास्त दोन स्पर्धा मध्ये सहभाग नोंदवावा.

*** खालील कलाप्रकारात एका स्पर्धकाने जास्तीत जास्त दोन स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवावा.**

(ई) **ललित कला (FINE ARTS) :**

१) **जलद चित्रकला स्पर्धा (On The Spot Painting) :**

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहील.

२) स्पर्धेसाठी एकूण २ तास ३० मिनीटे कालावधी देण्यात येईल.

३) रंग, ब्रश, पेन, पेन्सील असे इतर साहित्य स्पर्धकाने स्वतः आणावयाचे आहे. आयोजकांकडून फक्त कागद पुरविण्यात येईल.

४) स्पर्धेसाठीचा विषय ऐन वेळी दिला जाईल.

५) चित्राचा आकार २२" × १५" असावा.

६) तैल, जल, पोस्टर आणि पेस्टल रंगांचा वापर यासाठी करता येईल.

२) **चिकट चित्र स्पर्धा (Collage) :**

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहील.

२) स्पर्धेसाठी एकूण २ तास ३० मिनीटे कालावधी देण्यात येईल.

३) स्पर्धेसाठीचा विषय ऐन वेळी दिला जाईल.

४) आयोजकांकडून फक्त कागद पुरविले जातील. कात्री, डिंक, पेन, पेन्सील असे इतर साहित्य स्पर्धकाने स्वतः आणावयाचे आहे.

५) चिकट चित्राचा आकार १५" × २२" या आकाराचे असावे.

६) स्पर्धक इतर स्पर्धामध्ये उदा. व्यंगचित्र, चित्रकला, रांगोळी, पोस्टर, कोलाज वा मृदशिल्प इ. मधील वापरलेले साहित्य यामध्ये वापरु शकता.

७) परिसरातील कचरा तसेच टाकाऊ पदार्थ याकरीता वापरु शकता.

८) आधिच तयार करुन आणलेल्या प्रतिमा किंवा बाजारातून आणलेले तयार साहित्य वापरता येणार नाही.

३) **भित्तीचित्र स्पर्धा (Poster Making) :**

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहील.

२) स्पर्धेसाठी एकूण २ तास ३० मिनीटे कालावधी देण्यात येईल.

३) स्पर्धेसाठीचा विषय ऐन वेळी दिला जाईल.

४) रंग, ब्रश, पेन, पेन्सील असे इतर साहित्य स्पर्धकाने स्वतः आणावयाचे आहे. आयोजकांकडून फक्त कागद पुरविण्यात येईल.

४) **मृद्शिल्प स्पर्धा (Clay Modeling) :**

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहील.

२) स्पर्धेसाठी एकूण २ तास ३० मिनीटे कालावधी देण्यात येईल.

३) स्पर्धेसाठीचा विषय ऐन वेळी देण्यात येईल.

४) या स्पर्धेसाठी रंग व इतर साहित्य स्पर्धकाने स्वतः आणावयाचे आहे. फक्त माती पुरविली जाईल

५) शिल्प हाताने तयार करणे अपेक्षित आहे त्यासाठी चित्र, ठसे व साचा अशी इतर उपकरणे वापरता येणार नाही तसेच शिल्पास योग्य ते शिर्षक द्यावे लागेल.

५) **व्यंगचित्र स्पर्धा (Cartooning) :**

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहील.

२) स्पर्धेसाठी २:३० तास कालावधी देण्यात येईल. स्पर्धेसाठीचा विषय ऐन वेळी दिला जाईल.

३) रंग, ब्रश व इतर साहित्य स्पर्धकाने स्वतः आणावयाचे आहे. २२" × १५" चा कागद स्पर्धेपुर्वी पुरविला जाईल.

६) **रांगोळी स्पर्धा (Rangoli) :**

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहील.

२) स्पर्धेसाठी एकूण २ तास ३० मिनीटे कालावधी देण्यात येईल.

३) स्पर्धेसाठीचा विषय ऐैन वेळी दिला जाईल.

४) १२० सेमी × १६० सेमी या आकाराच्या आखुन दिलेल्या चौरसातच रांगोळी काढावी लागेल. ५) रंग व इतर साहित्य स्पर्धकाने स्वतः आणावयाचे आहे.

६) रांगोळी काढण्याकरीता चित्र, ठसे व साचा अशी इतर उपकरणे वापरता येणार नाही.

७) रांगोळीसाठी एकावेळी केवळ एकच माध्यम वापरणे अनिवार्य आहे. उदा. रांगोळी, फुले, डाळी, तांदुळ, भुसा इ.

७) **स्थळ छायाचित्रण (Spot Photography) :**

१) एका महाविद्यालयाच्या एकाच स्पर्धकास प्रवेश परवानगी राहील.

२) सहभागी स्पर्धकांनी १२ मेगा पिक्सेल पेक्षा अधिक नसेल इतका डिलीटल कॅमेरा स्वतः आणावा लागेल.

३) डिजीटल कॅमेरापेक्षा मेमरी कार्ड असावे. जे स्पर्धा आरंभ होण्यापुर्वी परिक्षकांद्वारे फॉरमॅट केले जाईल.

४) कमाल वेळ मर्यादा ही ०२ तास ३० मिनिटांची राहील.

५) परिक्षकांद्वारे वेळेवर घोषित होणाऱ्या विषयाची ०५ (पाच) छायाचित्रे काढावे लागतील.

६) छायाचित्रकांचे मिक्सींग, मॅचींग किंवा मॉर्फींग करता येणार नाही.

७) फोटोशॉप इत्यादी सारखे सॉफटवेअर वापरण्याची अनुमती राहणार नाही.

८) आयोजकांना काढलेली छायाचित्रे आवश्यक त्या ठिकाणी वापरण्याची अनुमती राहील.

९) डिजीटल इमेजेसचे परिक्षण हे प्रभाव, संरचना, तांत्रिक स्तर व अनुरुपता यावर आधारित केले जाईल.

१०) उपरोक्त व्यतिरिक्त अधिक सुचना वेळेवर देण्यात येईल.

-------------* * * * *-------------